International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# शेती क्षेत्रातील अनुदाने आणि वित्त आयोगाच्या अहवालाचा आढावा

**डॉ. सुनिल अण्णा गोरडे**

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड,
ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर. 431103
ईमेल: sunilgorde1982@gmail.com मोबाईल नंबर 9860714744

**प्रस्तावना:**

कृषी क्षेत्राला दिले जाणारे अनुदान या संदर्भात वेगवेगळ्या दृष्टिकोनातून चर्चा होत असल्याची दिसते. राजकोषीय तूट आणि कृषी क्षेत्राला दिली जाणारी अनुदान यासंदर्भात विविध मते मांडली जातात. भारतामध्ये कृषी क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या संघ आणि राज्य कृषी अनुदानाचे जीडीपीशी असलेले प्रमाण लक्षणीय आहे. खत विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना खताच्या किमती वरती अनुदान मिळते. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत वेगवेगळ्या माध्यमातून कृषी क्षेत्राला अनुदान दिले जाते. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पकालीन कर्जाच्या व्याजदरात सवलत अनुदान मिळते, शेतकऱ्यांना पीक काढणीनंतर गोदामात ठेवलेल्या मालावर गोदाम पावती वरती अल्पकालीन कर्जावरील व्याजदरात दोन प्रतिशत अनुदान मिळते. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळामध्ये जमीन, हवामान या नैसर्गिक आपत्तीमुळे जमिनीच्या मालमत्तेमध्ये झालेले नुकसान भरून काढण्यासाठी बँकांनी दिलेल्या कर्जावरती दोन प्रतिशत व्याजदरात अनुदान मिळते. सदरील संशोधन पेपर मध्ये कृषी अनुदानाच्या संदर्भात कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाची रचना व खर्चाचे स्वरूप, कृषी अनुदाना संदर्भातील योजना, पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालातील कृषी अनुदानाच्या संदर्भातील आढावा, कृषी उपक्षेत्र त्यांना दिलेली अनुदान आणि उत्पादन वृद्धीतील संबंध, खत विभागाच्या अनुदानाचे स्वरूप, शेतीतील अनुदानाचा दुरुपयोग या प्रमुख घटकांचा आढावा घेतलेला आहे.

**शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न आणि कृषी अनुदान:** पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की, कृषी क्षेत्रासाठी दिली जाणारी अनुदान ही तर्कसंगत असली पाहिजे. तसेच कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी शेती संशोधनांमध्ये आणि शिक्षणामध्ये गुंतवणूक वाढवण्याची आवश्यकता आहे. कृषी

क्षेत्रामध्ये सातत्याने वृद्धी करण्याची आवश्यकता आहे. जास्त मूल्य असलेली पिके लागवड करणे त्यामध्ये विविधिकरण करणे गरजेचे आहे. तसेच जे शेतकरी केवळ पिकांची लागवड (Cultivators) करतात त्यांना शेती व्यतिरिक्त, तसेच शेती पूरक व्यवसायामध्ये स्थानांतरित करणे अत्यावश्यक आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शिफारशी सुचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या डॉ. अशोक दलवाई समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नाचे मार्ग शोधले आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शिफारशी सुचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या डॉ. अशोक दलवाई समितीच्या अहवालामध्ये शेतकरी कुटुंबाला उत्पन्न वाढवण्यासाठी शेती पीक लागवडी बरोबरच इतर पूरक व्यवसायात जाण्याची आवश्यकता नमूद केलेली असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यामध्ये शेतकरी कुटुंबाला मिळणाऱ्या उत्पन्नापैकी 50 प्रतिशत उत्पन्न हे पिकांपासून मिळते. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावलेली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी पीक लागवडीपासून शेतकरी कुटुंबाला मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण कमी झाले पाहिजे. या घटकावरती शासकीय स्तरावरती नियोजित प्रयत्नाची आवश्यकता दिसते.

**कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय:** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासकीय स्तरावर वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न सुरू आहेत. कृषी क्षेत्राचा विकास करणे आणि शेतकऱ्यांचे कल्याण करणे या उद्देशाने कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय कार्यरत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत शेती संबंधित नियम त्याची अंमलबजावणी यासाठी सातत्याने प्रयत्न होतात. साधारणपणे भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा 17.7 प्रतिशत आहे. आपल्या देशामध्ये उपलब्ध असलेल्या एकूण रोजगारापैकी 44 प्रतिशत रोजगार हा आजही कृषी क्षेत्रातून निर्माण होतो. या दृष्टिकोनातून आजही कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे क्षेत्र असल्याचे दिसते. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून भारतातील कृषी क्षेत्रावरती खर्च होतो. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत प्रामुख्याने प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना, शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अल्पकालीन कर्जावरील व्याजदरामध्ये सवलत अनुदान, आणि प्रधानमंत्री पीक योजनेवरील खर्च मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते.

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय हे दोन विभागात काम करते. शेती सहकारिता आणि शेतकरी कल्याण विभाग (DACFW) हा विभाग प्रामुख्याने रब्बी आणि खरीप या पीक हंगामापूर्वी राज्यांच्या खतांच्या गरजेचे मूल्यांकन करण्याचे काम करतो तसेच सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देतो. सदरील घटकांचा संबंध कृषी अनुदानाशी आहे. कृषी संशोधन आणि शिक्षण विभाग (DARC) हा या मंत्रालयाचा दुसरा विभाग आहे. 1973 मध्ये या विभागाची स्थापना झाली. कृषी क्षेत्रातील संशोधन व शिक्षणाचे समन्वय

करणे आणि प्रोत्साहन देण्याचे काम हा विभाग करतो. मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय हे तिसरे विभाग कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयापासून वेगळे करण्यात आले आहे. या घटकांच्या अंतर्गत प्रामुख्याने कृषी क्षेत्राला अनुदानाची तरतूद केली जाते.

**कृषी अनुदानासंदर्भातील प्रमुख योजना:** व्याज सवलत योजना - सदरील योजनेची सुरवात खरीप हंगाम 2006- 07 पासून झाल्याचे दिसून येते. या अंतर्गत खालील बाबीवरती व्याज सवलत दिली जाते.

1. अल्पकालिन पीक कर्ज व्याज सवलत/अनुदान: या अंतर्गत शेतकरी सात टक्के व्याजदराने तीन लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकतात. यामध्ये शेतकऱ्यांना व्याजदरात तीन टक्के सवलत दिली जाते.
2. पीक कापणीनंतर कर्ज व्याज सवलत/अनुदान: केसीसी धारक लहान व सीमांत शेतकऱ्यांना सहा महिन्यांपर्यंत मान्यताप्राप्त गोदामामध्ये साठवण्यासाठी परवाना योग्य गोदाम पावतीवर पीक काढणीनंतर कर्ज उपलब्ध आहे. शेतकऱ्यांना सहा महिन्यांपर्यंत कर्जासाठी दोन टक्के व्याजदर सवलत या योजनेत दिली जाते.
3. नैसर्गिक आपत्ती व्याज सवलत अनुदान: पीक उत्पादन करत असताना हवामान, जमीन आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीतील मालमत्ता आणि पायाभूत सुविधा नष्ट होऊन होणारे नुकसान कमी करण्यासाठी व्याज अनुदान अंतर्गत दोन टक्के व्याज सवलत बँकांना दिली जाते.

**कृषी क्षेत्रातील अनुदानाचे स्वरूप:** कृषी क्षेत्रातील अनुदानाचे स्वरूप समजण्यासाठी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा खर्च, या विभागाच्या अंतर्गत शेती सहकारिता आणि शेतकरी कल्याण विभागाचा खर्च, शेतकऱ्यांना अनुदान प्राप्त करून देणाऱ्या अल्पकालीन कर्जावरील व्याजदरात दिली जाणारी सवलत योजना, खत विभागाच्या अंतर्गत दिले जाणारे अनुदान समजून घेणे आवश्यक आहे. या बाबींची सहजपणे माहिती व्हावी यासाठी 2020-21 या आर्थिक वर्षातील कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचे एकूण बजेट, मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या विभागांच्या खर्चाचे कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या खर्चाची असलेले प्रमाण या घटकांचा आढावा घेतला आहे.

**कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा खर्च:** 2020-21 या आर्थिक वर्षामध्ये कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचे एकूण बजेट 1,46,876 कोटी रुपये असल्याचे आढळून येते. ते GDP च्या 0.65 प्रतिशत असल्याचे दिसते. यामध्ये शेती सहकारिता आणि शेतकरी कल्याण विभागाचा वाटा 91 प्रतिशत, कृषी संशोधन आणि शिक्षण विभागाची तरतूद 6 प्रतिशत असल्याचे दिसून येते. तर मत्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय यावरती 3 प्रतिशत खर्चाची तरतूद केल्याचे आढळून येते.

2020-21 या आर्थिक वर्षामध्ये शेती सहकारिता आणि शेतकरी कल्याण विभागाच्या अंतर्गत सर्वात जास्त खर्च 56 प्रतिशत असल्याचे दिसून येते. त्यानंतर शेतकऱ्यांसाठी अल्पकालीन कर्ज व्याज सवलत

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

अनुदान योजनेवर 16 प्रतिशत खर्च झाल्याचे दिसून येते. त्यानंतर प्रधानमंत्री पीक विमा योजनेवर 12 प्रतिशत, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेवर 3 प्रतिशत, बाजार हस्तक्षेप (बाजारभाव घसरण झाल्यास नाशवंत आणि बागायती वस्तू खरेदीसाठी राज्य शासनाच्या विनंतीनुसार लागू) योजनेवर 1 प्रतिशत खर्च होत असल्याचे दिसून येते. तसेच प्रधानमंत्री अन्नदाता उत्पन्न संरक्षण अभियान यावरती 0.4 प्रतिशत, हरित क्रांती साठी 10 प्रतिशत, प्रधानमंत्री शेतकरी मानधन योजनेसाठी 0.2 प्रतिशत, आणि इतर बाबींसाठी 0.2 प्रतिशत तरतूद असल्याचे दिसून येते.

**कृषी अनुदान व उत्पादन वृद्धी यातील संबंध:** कृषी अनुदान आणि विकास हा घटक समजून घेण्यासाठी काही निकष वापरता येतात. कृषी उपक्षेत्रांतर्गत दिलेली अनुदान आणि त्या उपक्षेत्रांचा वृद्धीदर याचा आढावा आपल्याला घेता येतो. पंधराव्या वित्त आयोगाने सादर केलेल्या अहवालातील खंड तीन मध्ये कृषी क्षेत्रातील अनुदान आणि उत्पादन वृद्धीचे विश्लेषण केल्याचे आढळून येते. मत्स्यव्यवसाय, पशुपालन, फळे व भाजीपाला आणि अन्नधान्य, तेलबिया व डाळवर्गीय पिके यासंदर्भात सध्या अमलात असलेली तत्वे, या उपक्षेत्रांना मिळणाऱ्या अनुदानाचे प्रमाण आणि 2011-12 ते 2018-19 या काळात या कृषी उपक्षेत्रात झालेली उत्पादन वृद्धी या घटकांचा आढावा या अहवालातून घेता येतो. तक्त्यावरून असे दिसून येते की, खाजगी गुंतवणुकीस परवानगी दिलेल्या आणि उदारीकरण झालेल्या उपक्षेत्रामध्ये उत्पादन वृद्धी समाधानकारक झाल्याचे दिसून येते.

**तक्ता क्रमांक: 1**

**कृषी उपक्षेत्रांमध्ये झालेली उत्पादन वृद्धी**

| **उपक्षेत्र** | **अमलात आणलेली तत्वे** | **सरकारी अनुदान सहायता** | **उत्पादनामध्ये झालेली वृद्धी 2011-12 ते 2018-19 %** |
|---|---|---|---|
| मत्स्य व्यवसाय | **अनुदान नाही किंवा त्याचे प्रमाण कमी.**<br>**परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीस परवानगी.**<br>**अल्प प्रमाणात संस्थागत मदत.** | अत्यंत कमी प्रमाण | 9.65 |
| पशुपालन | **दूध आणि दूध उत्पादन अधिनियम 1992 चे उदारीकरण.** | अत्यंत कमी | 5.96 |

| | | | |
|---|---|---|---|
| | **दूध प्रकल्पामध्ये खाजगी गुंतवणुकीस परवानगी. सहकारी संस्था, दूध प्रकल्प, खाजगी संस्था यांना शेतकऱ्याकडून दुधाच्या सरळ खरेदीस परवानगी. बाजार नियंत्रण नाही.** | प्रमाण | |
| फळे व भाजीपाला | **बाजार मूल्य सहायता नाही. सदरील बाबींच्या आधानांसाठी अनुदान आहे. काही राज्यात बाजार समित्यांद्वारे नियंत्रण होते.** | मध्यम प्रमाण | 3.94 |
| अन्नधान्य, तेलबिया, डाळ वर्गीय पिके (MSP आधार असलेली पिके) | **MSP अंतर्गत जास्त अनुदान प्राप्त क्षेत्र. बाजार व्यवस्था बाजार समिती यांच्या अधिपत्याखाली नियंत्रित आहे. उत्पादन आणि बाजार यामध्ये अत्यंत कमी खाजगी गुंतवणूक.** | उच्च प्रमाण | 1.37 |

**Source: National Accounts statistics 2020, Output data at 2011-12 prices.**

**Finance Commission in Covid Times, Report for 2021-26, XV Finance Commission, Volume-III, The Union, October 2020.**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, कृषी क्षेत्रातील ज्या उपक्षेत्रामध्ये सरकारी अनुदान अत्यंत कमी आहे त्या उपक्षेत्राच्या उत्पादन वृद्धी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. याउलट ज्या उपक्षेत्रात सरकारी अनुदानाचे प्रमाण तुलनेने जास्त आहे त्या उपक्षेत्रातील उत्पादनाची वृद्धी कमी झालेली आहे.

**कृषी क्षेत्रातील घटकांची निर्यात:** कृषी क्षेत्रातील निर्यातीसंदर्भात भारताचे जगात 13 वे स्थान आहे. भारताची कृषी क्षेत्रातील निर्यात वाढविण्यासाठी कृषी क्षेत्रातील मालाची उत्पादकता व गुणवता वाढविण्याची आवश्यकता आहे. कृषी उप क्षेत्रातील अनुदाने आणि त्यांचे उत्पादन वृद्धी हे घटक परस्पर विरोधी असले तरी कृषी क्षेत्राच्या माध्यमातून अनुदानाचा लाभ मिळणाऱ्या तांदूळ, कापूस, साखर, सोयाबीन आणि गोठवलेले मांस या वस्तूंच्या निर्यातीमधून भारताला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळत असल्याचे 2018 च्या आकडेवारीवरून खालील तक्त्यातून दिसून येते.

**तक्ता क्रमांक: 2**

**कृषी क्षेत्रातील घटक आणि निर्यात**

| अ. क्र. | कृषी क्षेत्रातील घटक उत्पादन | 2018 या वर्षातील निर्यात मूल्य युएस डॉलर बिलियन |
|---|---|---|
| 1 | तांदूळ | 7.3 |
| 2 | गोठवलेली कोंळबी | 4.4 |
| 3 | गोठवलेले मांस | 3.3 |
| 4 | कापूस (कच्चा) | 2.4 |
| 5 | कापूस (कॉम्बेड कॉटन आणि कार्डेड कॉटन) | 2.2 |
| 6 | वनस्पती रस व अर्क | 1.0 |
| 7 | साखर | 0.9 |
| 8 | वनस्पती तेल व तूप | 0.9 |
| 9 | खली, सोयाबीन | 0.9 |

**Source: Finance Commission in Covid Times, Report for 2021-26,**

**XV Finance Commission, Volume-III, The Union, October 2020.**

वरील तक्त्यावरून अनुदानाचा लाभ मिळत असलेल्या कृषी क्षेत्रातील पिकांच्या आणि वस्तूंच्या निर्यातीतून परकीय चलन मिळत असल्याचे दिसून येते. या अनुषंगाने अनुदानाचा विचार होणे आवश्यक आहे.

**खतावरील अनुदाने:** भारतामध्ये खतांची आयात करणे व वितरण करणे तसेच खतावरील अनुदानाचे नियोजन करण्याचे काम खत विभाग करतो. खत विभागाचा मुख्य उद्देश हा खत उद्योगांचा विकास करून त्यामध्ये वाढ करणे आणि त्यासाठी योजना बनविणे हा आहे. भारतामध्ये खत अनुदान हे खत उत्पादक आणि आयातक यांना दिले जाते. आर्थिक वर्ष 2020-21 मध्ये खत विभागासाठी अंदाजपत्रकामध्ये 71000 कोटी रुपयांची तरतूद केल्याच्या आढळून येते. सदरील वर्षाच्या एकूण अंदाजपत्रकातील खर्चाच्या 2.35 प्रतिशत हा खर्च असल्याचे दिसून येते तर जीडीपीच्या 0.32 प्रतिशत असल्याचे दिसून येते. अन्नधान्यावरती देणाऱ्या अनुदानानंतर खतावरील अनुदान दुसरी मोठी बाब असल्याचे लक्षात येते. भारतामध्ये देण्यात येणाऱ्या एकूण अनुदानामध्ये खतावरील अनुदानाचे प्रमाण हे

27.2 प्रतिशत असल्याचे अनुमान आहे. खताचा वापर वाढत असल्यामुळे खत अनुदानावरील खर्चात वाढ होते तसेच युरिया खतावरील प्रति एकक अनुदानात वाढ झाल्यामुळे भारतातील खत अनुदान वाढल्याचे दिसून येते.

**खत अनुदाने आणि अडचणी**: युरिया खतासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानामुळे युरिया खताची किंमत नियंत्रित आहे. यामुळे युरिया खताचा वापर वाढतो. खताचा अतिरिक्त वापर वाढल्यामुळे मातीच्या सीमांत उत्पादकतेमध्ये घट होत आहे. खतासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची भारतामध्ये उपलब्धता नसल्यामुळे नैसर्गिक गॅस, फॉस्फेट आणि पोटॅश यासाठी लागणारा कच्चामाल मोठ्या प्रमाणात आयात करावा लागतो. त्यामुळे खताच्या आयातीवरील अत्याधिक निर्भरता वाढत जाते. युरिया खताची किंमत अनुदानामुळे नियंत्रित असल्यामुळे युरिया खताचा गैर कृषी क्षेत्रात वापर होऊन दुरुपयोग होत आहे.
खत अनुदान प्रणाली संदर्भात स्थायी समितीच्या शिफारशीनुसार शेती क्षेत्रासाठी खतावरील अनुदानाच्या रकमेचे प्रमाण मोठे असले तरी या संदर्भात सदरील खत अनुदान योजनेत फार मोठे बदल करू नये. सदरील बाबीचा अन्नसुरक्षा वरती विपरीत परिणाम होऊ शकतो त्यासाठी अगोदर मोठ्या प्रमाणात अध्ययन करून आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्या. शेतकऱ्यांना देण्यात येणारे खतावरील अनुदान हे खत खरेदीवर देण्यात यावे. शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतावरती प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण करण्यात यावा. ऑक्टोंबर 2016 मध्ये खत अनुदानासाठी प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजनेला भारतामध्ये सुरुवात झाली. खत विभागाने भारतामध्ये प्रायोगिक तत्त्वावर 16 जिल्ह्यांमध्ये या योजनेला सुरुवात केली. एकूण जगामध्ये वापरल्या जाणाऱ्या खतांपैकी भारतामध्ये नायट्रोजन खत वापरण्याचे प्रमाण 19.8 प्रतिशत, फॉस्फेट खत वापर 18.4 प्रतिशत तर पोटॅश खत वापर 9.1 प्रतिशत असल्याचे दिसून येते.

**खतांचा संतुलित वापर:** शेतमालाचे उत्पादन वाढवण्यासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणात खतांचा वापर करतात. खतांचा उपयोग संतुलित पणे करणे आवश्यक असते. वेगवेगळे खते कोणत्या प्रमाणात वापरली जावी या संदर्भात मानक असल्याचे दिसून येते. नायट्रोजन, फॉस्फेट व पोटॅश या खतांच्या वापराचे प्रमाण हे मानकानुसार 4:2:1 या प्रमाणात असणे आवश्यक आहे. परंतु भारतामध्ये 2016-17 या आर्थिक वर्षांमध्ये नायट्रोजन, फॉस्फेट व पोटॅश हे खत वापरण्याचे प्रमाण 6.7:2.7:1.34 या प्रमाणात असल्याचे आढळून आले. भारतामध्ये पोटॅश हे संपूर्णपणे आयात केले जाते. फॉस्फेट या खताची आयात निर्भरता 90 प्रतिशत आहे आणि प्राकृतिक गॅस आयात निर्भरता ही 60 प्रतिशत आहे. त्यामुळे संतुलित खतांचा वापर होणे आवश्यक आहे.

**तक्ता क्रमांक: 3**

**देशांतर्गत खताचे उत्पादन आणि खत आयातीचे प्रतिशत**

| घटक/ वर्ष | स्वदेशी युरिया | स्वदेशी DAP | स्वदेशी NPK | स्वदेशी SSP | एकूण स्वदेशी खत उत्पादन | एकूण आयात |
|---|---|---|---|---|---|---|
| 2011-12 | 37 | 7 | 13 | 7 | 64 | 36 |
| 2017-18 | 43 | 8 | 15 | 7 | 73 | 27 |

**संदर्भ: खतासंदर्भातील आकडे, भारतीय खत संघ (FAI), आणि संचलन विभाग, खत विभाग.**

खतावर मोठ्या प्रमाणात अनुदान द्यावे लागत असल्यामुळे तसेच खतांची आयात करावी लागत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होते. खतांचा संतुलित वापर झाल्यास खतांचा योग्य वापर होऊ शकतो. खतांचा संतुलित वापर करण्यासाठी भारतामध्ये 2015 मध्ये मृदा आरोग्य कार्ड योजना सुरू झाली. शेतीमध्ये कोणती खते किती प्रमाणात वापरावे यासंदर्भात योग्य मार्गदर्शन या योजनेच्या माध्यमातून होते. अप्रशिक्षित स्टाफ, विजेची अनउपलब्धता, इंटरनेटचा अभाव, लोकांमधील सदरील बाबीच्या जनजागृतीचा अभाव यामुळे सदरील योजनेची प्रभावीपणे अमलबजावणी होत नाही. यासाठी शिक्षण आणि संशोधनाच्या माध्यमातून जागृती वाढविणे आवश्यक आहे.

**कृषी क्षेत्रातील अनुदानाचे ओझे:** पंधरावा वित्त आयोगाच्या अहवालामध्ये केंद्र सरकारच्या एकूण कृषी क्षेत्राच्या अनुदानाचे अध्ययन केलेले दिसून येते. सदरील अहवालामध्ये कृषी क्षेत्राचे अनुदान हे रुपये 1,20,500 कोटी असल्याचे म्हटले आहे. यामध्ये खतावरील अनुदान रुपये 70,000 कोटी(2017-18), शेतकऱ्यांच्या अल्पकालीन कर्जावरील व्याज सवलत अनुदान रुपये 20,000 कोटी(2017-18), पिक विमा अनुदान रुपये 6500 कोटी(2018-19), आणि कृषी मूल्य समर्थन अनुदान रुपये 24,000 कोटी(2016-17) भारतीय सांख्यिकीय संस्थेने संशोधित केले आहे. याच काळामध्ये राज्य सरकारची वार्षिक कृषी अनुदान रुपये 1,15,500 कोटी असल्याचे नमूद केले आहे. यामध्ये वीज अनुदान रुपये 90,000 कोटी(2015-16), सिंचन अनुदान रुपये 17,500 कोटी(2013-14), पिक विमा अनुदान रुपये 6500 कोटी(2018-19) असल्याचे अहवालातून दिसून येते. राज्य सरकारांनी कृषी कर्जमाफीची केलेली घोषणा या बाबी कृषी अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करत असल्याचे दिसून आले आहे. केंद्र आणि राज्य एकूण कृषी क्षेत्र अनुदान हे जीडीपीच्या 2 ते 2.5 प्रतिशत असल्याच्या दिसून येते.

15 व्या वित्त आयोगाच्या अहवालातील कृषी अनुदाना संदर्भात अधोरेखित करण्यात आलेले घटक खालील प्रमाणे असल्याचे दिसून आले.

1. शेतमालाच्या किमान हमीभावासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानामुळे उत्पादन क्षमतेचा पूर्ण वापर होत नाही. पैशाचा उपयोग अनुत्पादक कार्यासाठी होतो.
2. वीज अनुदानामुळे नैसर्गिक साधनांचा अति वापर होतो. मोटार पंपाचा अति उपयोग व पाण्याचा वापर वाढतो.
3. व्याज सवलत अनुदान हे तर्कसंगत नाही. ग्रामीण बँकांच्या सदृढीकरण्यासाठी हा निधी खर्च करावा.
4. कर्जमाफी योजनेमुळे बँकिंग व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. भविष्यामध्ये कर्ज न भरण्यास शेतकऱ्यांना प्रेरणा मिळते.
5. मूल्य आधारित अनुदाने व कर्जमाफी संदर्भात फेरविचार करावा. उत्पन्न आधारित प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेसारख्या योजनेतून लाभ द्यावेत.
6. शेतकऱ्यांसाठी मोफत वीज देण्याऐवजी शेतकऱ्यांना वीज अनुदान देत असताना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण देण्यात यावे.
7. ड्रिप सिंचन वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. पाणी अभाव असलेल्या क्षेत्रामध्ये पाणी सघन पिकांपासून दुसरे पीक घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे.
8. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत कृषी संशोधन व शिक्षण विभागासाठी होणारा खर्च हा सदरील विभागाच्या एकूण खर्चाच्या सहा प्रतिशत आहे. तो वाढवण्याची आवश्यकता आहे.

**कृषी अनुदाना संदर्भातील सदरील घटकांची योग्य अंमलबजावणी केल्यास कृषी अनुदान अधिक तर्कसंगत होण्यास मदत होईल.**

**संदर्भ:**

1. Finance Commission in Covid Times, Report for 2021-26, XV Finance Commission, Volume-III, The Union, October 2020.
2. Finance Commission in Covid Time, Report For 2021-26, XV Finance Commission, Volume -IV, The States, October 2020.
3. Finance Commission in Covid Times, Report for 2021-26, XV Finance Commission, Volume-I, Main Report, October 2020.
4. Report of the committee on doubling farmers' income volume I To XIV, August 2017 to September 2018, Document prepared by the committee on doubling farmers income, Department of Agriculture, Cooperation and farmers welfare, Ministry of Agriculture and farmers welfare.
5. National Commission on Farmers - Fifth and final report, 4 October 2006.